Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 646 – 649
DOI: 10.5281/zenodo.10279021

**Original Research Article**

# महात्मा गांधी व चंपारण्य सत्याग्रह

पुनम अनिल कठारे

संशोधक विद्यार्थी, महात्मा फुले हाऊसिंग सोसायटी, ता. कंधार जि. नांदेड ४३१७१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: prashant@excelitservices.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

भारतातील बिहार राज्यातील चंपारण्या जिल्ह्यात शेतक-याचे प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा गांधी यांनी केलेले यशस्वी आंदोलन म्हणजे चंपारण्य सत्याग्रह होय. महात्मा गांधी इ.स. 1915 मध्ये दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले तेंव्हा त्यांनी भारत देश समजून घेण्यासाठी वर्षभर देशभ्रमंती केली. लखनऊ येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात (1916) महात्मा गांधी यांना बिहार मधील राजकुमार शुक्ला नावाचे गृहस्थ भेटले.[1] त्यांनी महात्मा गांधीजींना चंपारण्य जिल्ह्यास भेट देवून तेथील शेतक-यांच्या समस्या सोडविण्यासाठी विनंती केली. महात्मा गांधी यांनी राजकुमार शुक्ला यांच्या विनंतीस मान देऊन 1917 मध्ये चंपारण्य जिल्ह्यातील शेतक-याच्या अडचणी जाणून घेण्यासाठी भेट दिली.

## निळीच्या पिकांची सक्ती

चंपारण्य जिल्ह्यात वर्षानुवर्ष निळीची शेती करण्यासाठी शेतक-यावर सक्ती करण्यात आली होती. तेथील बहुसंख्य जमीनदार हे ब्रिटिश होते. इंग्लंड मध्ये निळीला प्रचंड प्रमाणात मागणी होती. त्यामुळे तेथील जमिनदारांनी शेतक-याकडून निळीचा लागवड करून नीळ इंग्लंडला पाठवून खूप नफा कमवण्याचा नविन मार्ग शोधला आणि त्या प्रमाणे ब्रिटिशांनी शेतक-यांना इतर पिके सोडून फक्त निळीची शेती करण्यास भाग पाडले.[2] शेतक-यांनी निळी शिवाय इतर कोणतेही पिक घेतले तर त्यांना मोठा शेतसारा भरावा लागत असे. शेतकज्यांना इतर पिके सोडून त्या काळातील नगदी पिका मधील सर्वात जास्त उत्पन्न व नफा देणारे पिक निळीचे उत्पादन घेण्यास सक्ती करण्यात आली. महात्मा गांधीजी यांनी चंपारण्य जिल्ह्यात जावून शेतक-यावर होणा-या अन्याय अत्याचाराची माहिती घेतली महात्मा गांधीजी यांनी

चंपारण्य जिल्ह्यातील 850 खेड्यातून सुमारे 8000 शेतक-याच्या समस्या लिहून घेतल्या शेतक-यांना ब्रिटिशांच्या साखळ दंडातून मुक्त करण्याची तीव्र इच्छा गांधीजीच्या मनात निर्माण झाली.

**भरमसाठ शेतसारा**

चंपारण्य येथील शेतजमीन सुपीक होती. मोठ्या प्रमाणात शेतीला वाव होता. परंतु येथे ब्रिटीशांनी शेतक-यांना निळीची शेती करण्याची सक्ती केली होती. तसा ब्रिटिश शासनाकडून कायदा ही करवून घेतला होता. निळीच्या शेतीत काम करणे खुप कष्टाचे होते. शेतक-यांचा पूर्ण दिवस शेतीत राबण्यातच जात असे. शेतक-यांची स्थिती गुलामासारखीच होती. पिढ्यानपिढ्या अन्याय अत्याचार शेतकरी निमुटपणे सहन करीत होती. एखाद्या शेतक-याने निळी ऐवजी इतर धान्य पिकाचे उत्पन्न घेतले तर त्या शेतक-यावर दंडात्मक कर भरावा लागत असे जमीनदारांनी शेतक-यावर उत्पन्नाचा तीन चतुर्थांश भाग भाडे म्हणून भरण्याची सक्ती केली.[3] सततच्या निळीच्या उत्पन्नामुळे सुपीक जमीनीचा पोत घसरला त्यामुळे या जमिनीवर इतर नगदी पिकांचे उत्पन्न घेणे कठीण झाले. त्यामुळे शेतकज्यांना कोणताही नफा शेतीमधून मिळत नसे त्यातच भरमसाठ शेतसारा भरणे म्हणजे मोठे संकट होते. ब्रिटिश शासन ही शेतक-यावर होणा-या अन्याय अत्याचाराकडे दुर्लक्ष करीत. या सगळया त्रासामुळे शेतक-याची स्थिती अत्यंत दयनीय झाली.

**अन्न धान्याचा तुटवडा**

हजारो शेतकरी अन्नधान्याच्या उत्पादनाऐवजी निळीची शेतीच करण्यास बंधीस्त होते. निळीच्या शेतीस सुपीक जमीन, भरपूर प्रमाणात पाणी लागत असल्या कारणाने जमिनीतील मूलद्रव्य अधिक प्रमाणात शोषली जात असल्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होत गेली. शेतक-यांना स्वत:च्या शेतीतून पोटापुरते अन्नधान्यही मिळत नसे. निळीची शेती करणे सक्तीचे करण्यात आल्यामुळे त्या भागात अन्नधान्याचा तुटवडा भासू लागला. अनेक शेतक-यांना उपासमारीला सामोरे जावे लागले.

**गांधीजींचा चंपारण्य सत्याग्रह**

महात्मा गांधी यांनी राजकुमार शुक्ला यांच्या विनंती वरून चंपारण्य या ठिकाणी शेतक-याच्या समस्या जाणून घेण्यासाठी भेट दिली. हजारोच्या संख्येने शेतकरी जमा झाले. शेतक-यांनी महात्मा गांधीजी आपल्यावर झालेले अन्यय अत्याचार याची सर्व माहिती सांगितली. राजुकमार शुक्ला यांनी सांगितलेल्या समस्यांपेक्षा येथील शेतक-याची परिस्थिती खूप भयानक होती. याची जाणीव महात्मा गांधीजींना झाली. शेतक-यांवर होणा-या अन्याय अत्याचारास वाचा फोडण्यासाठी गांधीजींनी चंपारण्यामध्येच तळ ठोकला. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी चंपारण्य जिल्ह्यातील नीळ उत्पादक शेतक-यांच्या मागण्यांसाठी महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांविरूध्द आंदोलन उभे केले. गांधीजींनी शेतक-यावर झालेल्या अन्याय अत्याचाराच्या कथाच्या नोंदी घेतल्या, त्या ठिकाणी असलेल्या शासनाच्या प्रिती निधीला भेटले. ब्रिटिशांच्या, जमिनदारांच्या गुलामीतून शेतक-याची मुक्तता करण्यासाठीच्या तीव्र इच्छेने वणव्याचे स्वरूप घेतले आणि दि. 10 एप्रिल 1917 रोजी महात्मा गांधीजींनी आपला पहिला अहिंसात्मक सत्याग्रह यशस्वी केला.[4] हा सत्याग्रह

यशस्वी करण्यासाठी महात्मा गांधीजीसह ब्रिजकिशोर प्रसाद, डॉ. राजेंद्र प्रसाद, मौलाना मजहरूल हक, अनुग्रह नारायण सिन्हा, बाबू गया प्रसाद सिंह, रामनवमी प्रसाद, महादेव देसाई, आचार्य कृपालानी व चंपारण्य येथील शेतक-यांचा सहभाग होता.[5] गांधीजीचे हे भारतातील पहिलेच आंदोलन होते यात मिळालेल्या यशाने त्यांनी देशपातळीवर आपले नेतृत्व प्रस्थापित केले.

**चौकशी समिती व निकाल**

महात्मा गांधीजींनी अहिंसात्मक मार्गाने सत्याग्रह सुरु केला. ब्रिटिश सरकारने गांधीजींना चंपारण्य जिल्हा सोडून जाण्याचा आदेश दिला. परंतु गांधीजींनी माघार घेतली नाही महात्मा गांधीजींनी शेतक-याच्या समस्या, त्यांच्यावर झालेले अत्याचार ब्रिटिश सरकार पुढे सादर केले. ब्रिटिश सरकारला चंपारण्यातील परिस्थितीची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमावी लागली. या समितीने सर्व बाबींची शाहनिशा करून शेतक-याच्या सर्व तक्रारी ख-या ठरवल्या.[7] याचा परिणाम म्हणजे कर आकारणी व भाडे तत्वात सुधारणा करण्यात याव्यात असा आदेश निघाला. तीन काठीया ही अन्यायकारक पध्दत रद्द करण्यात आली. बेकायदेशीररित्या आकारण्यात येणा-या कर पट्टया रद्द करण्यात आली. सक्तीने नीळ उत्पादन घेण्याची पध्दत बंद करण्यात आली. सरकारने समितीच्या अहवालास अनुसरून चंपारण्य कृषी कायदा संमत केला. नायब राज्यपाल सर एडवर्ड गेट यांनी कायद्याची अंमलबजावणी केली.[8] समितीच्या शिफारशी प्रमाणे शेतक-यांना कोणताही दंड लावण्यात येणार नाहीत. शेतक-यांना त्यांच्या निवडीचे पीक घेण्याची मुभा देण्यात आली. शेतक-यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय अत्याचार होणार नाही याची शाश्वती देण्यात आली. गांधीजींनी अहिंसेच्या मार्गाने केलेल्या सत्याग्रहामुळे हे शक्य झाले. या सत्याग्रहामुळे शेतकरी अन्याय, अत्याचारापासून मुक्त झाले. अत्याचाराने भयग्रस्त असलेला शेतकरी यातून भयमुक्त झाला. चंपारण्य सत्याग्रहामुळे जमीनदार हे अजिंक्य नाहीत, त्यांना विरोध करता येतो. शस्त्रबळ व संघटनेचे सामर्थ्य नसले तरी आत्मबळ आणि सत्य आणि अहिंसा या मार्गाने अन्याचाचा प्रतिकार करता येतो. याची जाणीव शेतक-यांना झाली. कोणत्याही संघटनेशिवाय कोणाच्या पाठिंब्याशिवाय महात्मा गांधीजींचा हा पहिला व यशस्वी सत्याग्रह होता. गांधीजींनी सत्य अहिंसा व सत्याग्रह या मार्गांनी जिंकलेली ही पहिली यशस्वी लढाई होय.

**अत्याचारातून मुक्ती**

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली 1917 मध्ये बिहारच्या चंपारण्य जिल्ह्यात ब्रिटिशांच्या नीळ धोरणाविरूध्द सत्याग्रह करण्यात आला. या अहिंसात्मक मार्गाने केलेल्या सतयाग्रहाचे फलित म्हणजे सरकारने चौकशी समितीची नेमणूक केली. या समितीच्या वतिने अहवाल सादर करण्यात आला. सरकारने समितीच्या अहवालास अनुसरून चंपारण्य कृषी कायदा संमत केला. चंपारण्य येथे सुरू असलेल्या सर्व कुप्रथांना कायद्याच्या चौकटीत बंदिस्त करण्यात आले. हे सर्व यशस्वी झाले. महात्मा गांधीजींनी केलेल्या सत्याग्रहामुळे शेतकरी वर्ग अन्याय अत्याचारापासून मुक्त झाले. या सत्याग्रहास 2017 मध्ये 100 वर्षे पूर्ण झाली.[9] भारतीय स्वातंत्र्य चळवळीत हा सत् याग्रह ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण

उठाव मानला जातो. या ऐतिहासिक सत्याग्रहाच्या यश प्राप्तीने महात्मा गांधींनी देशपातळीवर आपले नेतृत्व प्रस्थापित केले.

**संदर्भ सूची**

१. बेल्हेकर, एन.के., आधुनिक भारताचा इतिहास, दिल्ली 2003.

२. कंधारपूर त्रौमासिक, अंक ऑक्टोबर 2016 ते डिसेंबर 2017.

३. काळे, व्ही.एम. अनु., आधुनिक भारत पुणे, 2015.

४. डॉ. कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, 2013.